Letter Head 2014-15 NSS

# Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University

Aurangabad - 431 004. (Govt. of Maharashtra)

NAAC Accredited 'A' Grade

Not Me But You

# NATIONAL SERVICE SCHEME

Tel.- (Office) : +91-240-2403134
Tel- (Office) : +91-240-2403135
Tel-Fax (O) : 91-240-2403134
E-mail : nss@bamu.ac.in
Website : www.nss.bamu.ac.in

Dr. Bhimrao Bhosale
(M.A. English; UGC NET, JRF; Ph.D.)
Programme Co-ordinator
Mobile : 9765355977

Ref. No. NSS/ 2017/02-232 Date : ३/१/२०१६

**प्रति,**
**मा. प्राचार्य/ कार्यक्रमाधिकारी**
**राष्ट्रीय सेवा योजना, सर्व संलग्नीत महाविद्यालये,**
**औरंगाबाद शहर,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**औरंगाबाद.**

**विषयः- रोकडरहित महाराष्ट्र (Cashless Maharashtra) धोरण राबविण्यात राष्ट्रीय सेवा योजनेचा सहभाग नोंदविणे बाबत.**

संदर्भ क्रः- शासन परिपत्रक क्र. रासेयो/२०१६/प्र.क्र.१८४/ साशि-७ दि.१७/१२/२०१६, महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई. संदर्भिय पत्रानुसार केंद्र शासनाने रोकडरहित भारत (Cashless India) या धोरणांची अंमलबजावणी करण्याच्या निर्णयाचा एक भाग म्हणून रोकडरहित महाराष्ट्र (Cashless Maharashtra) धोरण राबविण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतलेल्या आहे. पुढील ३ महिन्यामध्ये संपूर्ण राज्य रोकडरहित व्हावे या धोरणाच्या अनुषंगाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व संलग्नीत महाविद्यालयांनी कार्यक्रमाधिकारी, स्वयंसेवक यांनी उपक्रमामध्ये सहभागी व्हावे. स्वेच्छेने पुढे येणाऱ्या अशा विद्यार्थ्यांना रोकडरहित महाराष्ट्राचे स्वयंसेवक (Cashless Maharashtra Volunteers) म्हणून घोषित करण्यात यावे.

या उपक्रमाच्या अनुषंगाने राज्यातील सर्व महाविद्यालये यामधील राष्ट्रीय सेवा योजनेचे (NSS) कार्यक्रम अधिकारी ,स्वयंसेवक/विद्यार्थी यांना खालीलप्रमाणे सूचना करण्यात येत आहे.

१. प्रत्येक जिल्हयाचे जिल्हाधिकारी हे या उपक्रमाचे नेतृत्व करणार असून ते जिल्हाचा कृती आराखडा तयार करणार आहेत.
२. सदर कृती आराखडयाची अंमलबजावणी करतांना सर्वसामान्यांचे प्रबोधन व प्रशिक्षण करणे आवश्यक असणार आहे. विद्यापीठ व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना या विषयाचे प्रशिक्षण देऊन त्यांना इतरांचे प्रबोधन करायला सज्ज करावे.
३. राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकाऱ्यांनी या योजनेतील विद्यार्थ्यांना रोकडरहित महाराष्ट्र करण्याबाबत स्थानिक राष्ट्रीयीकृत बँकेच्या अधिका-यांमार्फत विविध कार्यशाळा आयोजित करुन त्याप्रमाणे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये जागृती करावी.
४. राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी/ स्वयंसेवक यांना प्रथम रोकडरहित (Cashless) व्यवहार करण्यास प्रोत्साहित करावे. त्याचप्रमाणे त्यांना जिल्यात वेगवेगळया भागात पाठवून इतरांचे प्रबोधन करण्यास उद्युक्त करावे. प्रबोधनाकरिता अशाप्रकारे मनुष्यबळ उपलब्ध आहे हे जिल्हाधिकारी यांना अवगत करावे.
५. या उपक्रमामध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांना प्रोत्साहनपर पारितोषिक/पुरस्कार देण्यात यावेत.
६. महाविद्यालयीनस्तराव राष्ट्रीय सेवा योजनेच्या एककांनी वरील प्रमाणे कार्यवाही करावी तसेच अहवाल राष्ट्रीय सेवा योजना विभागात वेळोवेळी सादर करावा.

**टिपः- विद्यापीठस्तरावर राष्ट्रीय सेवा योजनेच्या एककांनी वरील प्रमाणे कार्यवाही करावी तसेच अहवाल राष्ट्रीय सेवा योजना विभागात वेळोवेळी सादर करावा.**

कार्यक्रम समन्वयक

सोबत शासनाचे पत्र :-

रोकडरहित महाराष्ट्र (Cashless Maharashtra)
धोरणांची अंमलबजावणी करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्र.रासयो/२०१६/प्र.क्र.१८४/साशि-७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १७ डिसेंबर, २०१६

**परिपत्रक**

केंद्र शासनाने रोकडरहित भारत (Cashless India) या धोरणांची अंमलबजावणी करण्याच्या निर्णयाचा एक भाग म्हणून "रोकडरहित महाराष्ट्र (Cashless Maharashtra)" धोरण राबविण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतलेला आहे. पुढील ३ महिन्यामध्ये संपूर्ण राज्य रोकडरहित व्हावे या धोरणाच्या अनुषंगाने राज्यातील विद्यापीठे / महाविद्यालये यामधील राष्ट्रीय सेवा योजनेचे (NSS) कार्यक्रम अधिकारी / समन्वयक / स्वंयसेवकांना या उपक्रमामध्ये सहभागी करून घ्यावे. स्वेच्छेने पुढे येणाऱ्या अशा विद्यार्थ्यांना रोकडरहित महाराष्ट्राचे स्वंयसेवक (Cashless Maharashtra Volunteers) म्हणून घोषित करण्यात यावे.

या उपक्रमाच्या अनुषंगाने राज्यातील सर्व विद्यापीठे / महाविद्यालये यामधील राष्ट्रीय सेवा योजनेचे (NSS) कार्यक्रम अधिकारी / समन्वयक अधिकारी / स्वंयसेवक / विद्यार्थी यांना खालीलप्रमाणे सूचना करण्यात येत आहेत.

१) प्रत्येक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हे या उपक्रमाचे नेतृत्व करणार असून ते जिल्ह्याचा कृती आराखडा तयार करणार आहेत.

२) सदर कृती आराखड्याची अंमलबजावणी करतांना सर्वसामान्यांचे प्रबोधन व प्रशिक्षण करणे आवश्यक असणार आहे. विद्यापीठ व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना या विषयाचे प्रशिक्षण देऊन त्यांना इतरांचे प्रबोधन करायला सज्ज करावे.

३) राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकाऱ्यांनी / समन्वयकांनी या योजनेतील विद्यार्थ्यांना रोकडरहित महाराष्ट्र करण्याबाबत स्थानिक राष्ट्रीयीकृत बँकेच्या अधिकाऱ्यामार्फत विविध कार्यशाळा आयोजित करून त्याप्रमाणे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये जागृती करावी.

४) राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी / स्वंयसेवक यांना प्रथम रोकडरहित (Cashless) व्यवहार करण्यास प्रोत्साहित करावे. त्याचप्रमाणे त्यांना जिल्ह्यात वेगवेगळ्या भागात पाठवून इतरांचे प्रबोधन करण्यास उद्युक्त करावे. प्रबोधनाकरिता अशाप्रकारे मनुष्यबळ उपलब्ध आहे हे जिल्हाधिकारी यांना अवगत करावे.

५) या उपक्रमामध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वंयसेवकांना प्रोत्साहनपर पारितोषिक / पुरस्कार देण्यात यावेत.

उपरोक्त सूचनांची अंमलबजावणी राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी आणि समन्वयक यांनी विद्यापीठे आणि महाविद्यालये यांचेमार्फत करावी. त्याबाबतचा अहवाल शासनास वेळोवेळी सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(पां. म. तांकटे)
उप सचिव , महाराष्ट्र शासन

प्रति,

१) सर्व विद्यापीठांचे कुलगुरू.
२) सर्व विद्यापीठांचे प्रबंधक त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी परिपत्रकातील सूचना त्यांच्या अधिनस्त महाविद्यालयांच्या निदर्शनास आणाव्यात.
३) मा. मुख्यमंत्री, महोदयांचे खाजगी सचिव.
४) मा. वित्त मंत्री, महोदयांचे खाजगी सचिव.
५) मा. मंत्री, (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी.
६) मा. राज्यतंत्री, (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
७) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक.
८) उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व उप सचिव.
९) उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व कार्यासने.
१०) वित्त विभाग.
११) नियोजन विभाग.
१२) निवड नस्ती, साशि-७